


# काल पार्टीत जेव्हा रे तू दिसला..

(चाल-उडे जब जब झूल्फे तेरे )

लोलीटा- काल पार्टीत जेव्हा रे तू दिसला, माझ्याकडे तू बघून असा हासला
की जीव माझा तुझ्यावरती , तेव्हा जडला

बिली- तू पोर ग कोण अन् कुठली, नाही कधी तू कशी ग मला दिसली
नजर माझी तूझ्यावरती, आता बसली

लोलीटा- मी ईन्टर्न व्हाईट हाऊसातली, माझ नांव 'लोलीटा लव्हली'
म्हणून आता तुझी रे माझी, जोडी जमली

बिली- वरी चांदण्याचा मेळा सारा जमला, मदी चंद्र कोठे ग नाही दिसला
की तुला पाहून तो लाजला, अन् लपला

लोलीटा- राजाराघू तू मी मैनाराणी, येऊन प्रेमात गाऊया गाणी
फुलवू प्रीत तुझी न् माझी, गुलाबवाणी

बिली- तुझ्या केसात गुलाबी फूल, अन् कानात नाचती डूल
तू बुलबुल अशी देशी ग कशी, मला हूल

लोलीटा-मी पोर रे न्यूयॉर्क गावची, आहे तिखट लवंगी मिरची
की मला बघ सांभाळ जरा, ओठावरती

सुहास पै